सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग-२०२५/ प्र.क्र.२२/ कार्यासन-१, दि.१३/११/२०२५

**विषय** :- दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणा-या छळ (Abuse), हिंसाचार (Violence) आणि शोषण (Exploitation) यांपासून संरक्षण करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन,गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग-२०२५/प्र.क्र.२२/कार्यासन-१, दि.१३/११/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५१११३१६०७५५०२३५ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
PRAVIN MADHUKAR SHIKHARE
Date: 19-11-2025 21:53:18

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था/ नियोजन व समन्वय/आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.

अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.
विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.
संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.
सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).
पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.
प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.
सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.
सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.
सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.
सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणाऱ्या छळ (Abuse), हिंसाचार (Violence) आणि शोषण (Exploitation) यांपासून संरक्षण करणेबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**दिव्यांग कल्याण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- दिव्यांग-2025/ प्र.क्र.22/ कार्यासन 1.**
31,32,35 "ए" विंग, तिसरा मजला, मित्तल टॉवर
बॅरिस्टर रजनी पटेल मार्ग, नरिमन पॉईंट,
मंत्रालय, मुंबई - 400 021.
**दिनांक :- 13 नोव्हेंबर, 2025.**

**संदर्भ -:** **1.** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016
**2.** दिव्यांग व्यक्ती हक्क नियम, 2017
**3.** फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973

**प्रस्तावना -:**

महाराष्ट्र शासन, दिव्यांग व्यक्तींची प्रतिष्ठा, हक्क आणि सुरक्षा यांचे संरक्षण करण्यास कटीबध्द आहे. दिव्यांग व्यक्ती असुरक्षितता आणि इतरांवरील अवलंबनामुळे अत्याचार आणि हिंसाचाराच्या बळी ठरल्या आहेत.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 7 नुसार, समुचित शासन दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणाऱ्या/ घडणाऱ्या सर्व प्रकारच्या छळ (Abuse), हिंसाचार (Violence) आणि शोषणापासून (Exploitation) संरक्षण देण्यासाठी उपाययोजना करेल. कलम 7(1)(अ) नुसार समुचित शासन अशा घटनांची दखल घेईल आणि अशा घटनांच्या विरोधात कायदेशीर उपाय उपलब्ध करतील.

2. कार्यकारी दंडाधिकाऱ्यांना दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणाऱ्या/ घडणाऱ्या छळ (Abuse), हिंसाचार (Violence) आणि शोषणाविरुध्द (Exploitation) प्रतिंबधात्मक आणि संरक्षणात्मक उपाययोजना करण्याचे अधिकार आहेत. सदर कार्यवाहीची प्रक्रिया दिव्यांग व्यक्ती हक्क नियम, 2017 च्या नियम 6 अंतर्गत निश्चित करण्यात आली आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 7 अंतर्गत तक्रारींचे निवारण करण्यासाठी, कार्यकारी दंडाधिकारी फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 च्या कलम 133 ते 143 (भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, 2023 च्या कलम 152 ते 162) अंतर्गत प्रदान केलेल्या प्रक्रियेचे पालन करतील असे नमूद आहे.

3. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 7 च्या प्रभावी अमलबजावणीसाठी आणि दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणारे छळ (Abuse), हिंसाचार (Violence) आणि शोषणापासून (Exploitation) सरंक्षण सुनिश्चित करण्याची जबाबदारी शासनावर सोपविण्यात आलेली आहे. त्यानुसार दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 7(1) च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी "उपविभागीय दंडाधिकारी" आणि "जिल्हा दंडाधिकारी" यांना या तरतुदी अंतर्गत दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणाऱ्या छळ (Abuse), हिंसाचार (Violence) आणि शोषण (Exploitation) यांपासून संरक्षण करणेबाबत एकसमान मानक कार्यपध्दती (Standard operating procedure -

SOP ) विकसित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती, त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.

**शासन निर्णय-:**

**1. सक्षम प्राधिकारी**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 7 नुसार "उपविभागीय दंडाधिकारी" आणि "जिल्हा दंडाधिकारी" दिव्यांग व्यक्ती विरोधी छळ (Abuse), हिंसाचार (Violence) आणि शोषणांच्या (Exploitation) घटनांची दखल घेतील आणि अशा घटनांविरुध्द कायदेशीर उपाययोजना करण्यासाठी "सक्षम प्राधिकारी" म्हणून काम करतील. तसेच अशा घटना टाळण्यासाठी (Prevention) पावले उचलतील. अशा घटनांमधील पिडीतांना वाचवणे, संरक्षण आणि पुनर्वसन करणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करतील. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 7 च्या उद्देशाने, "उपविभागीय दंडाधिकारी/ जिल्हा दंडाधिकारी" खालील नमूद अधिकारांचा वापर करतील.

1.1 दिव्यांग व्यक्तींचे हक्क अधिनियम, 2016 चे कलम 7.

1.2 दिव्यांग व्यक्तींचे हक्क नियम, 2017 चा नियम 6.

1.3 फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 चे कलम 133 ते 143 (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम 152 ते 162).

**2. कार्यवाहीची प्रक्रिया**

2.1 पिडीत दिव्यांग व्यक्ती/ प्राधिकृत व्यक्ती, दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणाऱ्या छळ (Abuse), हिंसाचार(Violence) आणि शोषणांच्या (Exploitation) घटनाबाबत पोलीस स्टेशनला तक्रार दाखल करू शकतील.

2.2 पोलीस प्रशासनाकडे अशी तक्रार प्राप्त झाल्यास ते "उपविभागीय दंडाधिकारी/ जिल्हा दंडाधिकारी" यांचेकडे तक्रार दाखल करतील. "उपविभागीय दंडाधिकारी/ जिल्हा दंडाधिकारी" दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 7 तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता, 1973 च्या कलम 133 ते 143 (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम 152 ते 162) नुसार संबंधित तक्रारीवर कार्यवाही करतील.

2.3 दिव्यांग व्यक्तींसाठी काम करणाऱ्या संस्था यांना दिव्यांग व्यक्तीच्या विरोधात छळ (Abuse), हिंसाचार(Violence) आणि शोषण (Exploitation) होण्याची शक्यता जाणवल्यास ते याबाबतची तक्रार "उपविभागीय दंडाधिकारी/ जिल्हा दंडाधिकारी" यांचेकडे देऊ शकतील.

2.4 "उपविभागीय दंडाधिकारी/ जिल्हा दंडाधिकारी" हे स्वतःहून (Suo Moto) दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणाऱ्या छळ (Abuse), हिंसाचार(Violence) आणि शोषणांच्या (Exploitation)बाबत तक्रार दाखल करू शकतील आणि त्याच्यावर फौजदारी

प्रक्रिया संहिता (CrPC) च्या कलम 133 ते 143 (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम 152 ते 162) नुसार कार्यवाही करतील.

**3. कारवाईची व्याप्ती**

कोणतीही दिव्यांग व्यक्ती, दिव्यांग संस्था, स्वयंसेवी संस्था, पोलिसांकडून दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात छळ, हिंसाचार आणि शोषण यांबाबत तक्रार प्राप्त झाल्यावर किंवा स्वतः हून माहिती मिळाल्यावर “उपविभागीय दंडाधिकारी/ जिल्हा दंडाधिकारी” हे खालील कार्यवाही करतील.

3.1 त्वरित प्रतिबंधात्मक आणि संरक्षणात्मक उपाययोजना करतील.

3.2 तातडीच्या परिस्थितीत अंतरिम आदेश निर्गमित करतील.

3.3 सुरक्षा, वैद्यकीय मदत, पुनर्वसन आणि इतर सुविधा पुरवण्याचे निर्देश पोलिस / प्रशासनाला देतील.

3.4 तक्रारदारास त्या घटनांविरुद्ध उपलब्ध कायदेशीर उपाययोजना प्रदान करतील.

3.5 दिव्यांगांच्या हक्कांवर परिणाम करणारे अडथळे किंवा उपद्रव दूर करतील.

**4. प्रकिया**

4.1 दिव्यांगाच्याबाबत घडलेल्या छळ (Abuse)/ हिंसाचार(Violence)/ शोषणांच्या (Exploitation) तक्रार प्राप्त झाल्यावर “सक्षम प्राधिकारी” फौजदारी प्रक्रिया संहिता (CrPC) च्या कलम 133 ते 143 (भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, 2023 चे कलम 152 ते 162) नुसार त्वरित कार्यवाही करतील. “सक्षम प्राधिकारी” यांनी दिलेल्या आदेशानुसार अनुपालन न केल्यास भारतीय दंड संहितेच्या, कलम 188 (भारतीय न्याय संहिता, कलम 223) नुसार शिक्षेस पात्र असतील.

4.2 “सक्षम प्राधिकारी” हे या निष्कर्षास पोहोचले की, कथित कृत्य किंवा वर्तन दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 92 नुसार कारवाईस पात्र असेल. तर पुढील कारवाईसाठी सदर प्रकरणाचे अधिकार क्षेत्र असलेल्या न्यायिक दंडाधिकारी/ महानगर दंडाधिकाऱ्यांकडे (Judicial Megistrate/ Metropolitan Megistrate) तक्रार वर्ग करतील.

**5. आदेशांचे स्वरूप**

“सक्षम प्राधिकारी” यांनी दिलेल्या आदेशांमध्ये खालील मुद्यांचा अंतर्भाव असेल;

5.1 हक्कांवर परिणाम करणारे अडथळे किंवा उपद्रव दूर करणे.

5.2 छळ, क्रुरता किंवा बेकायदेशीर वर्तन प्रतिबंधित करणे.

5.3 आवश्यक असल्यास पोलिस संरक्षण देणे किंवा तात्पुरत्या स्वरुपात ताब्यात घेण्याची कारवाई करणे.

5.4 परिच्छेद क्रमांक 4.2 प्रमाणे कार्यवाही करणे.

**6. शासनास अहवाल सादर करणे.**

6.1 **मासिक :**

6.1.1 "पोलीस अधीक्षक/ पोलीस आयुक्त", "जिल्हा दिव्यांगत्व समितीला" प्राप्त झालेल्या तक्रारींबाबत अनुपालन अहवाल सादर करतील.

6.1.2 "उपविभागीय दंडाधिकारी" हे "जिल्हा दिव्यांगत्व समितीला" सर्व तक्रारी, केलेली कार्यवाही आणि परिणामांचा अहवाल सादर करतील.

6.1.3 "जिल्हा दंडाधिकारी" सर्व तक्रारी, केलेली कार्यवाही आणि परिणामांचा अहवाल "जिल्हा दिव्यांगत्व समितीला" सादर करतील.

6.2 **मासिक :** "जिल्हा दिव्यांगत्व समिती", जिल्ह्याचा अहवाल प्रत्येक महिन्याला "राज्य दिव्यांग आयुक्तांना" सादर करतील.

6.3 **तिमाही :** "राज्य दिव्यांग आयुक्त", "दिव्यांगत्व समितीने" पाठविलेल्या अहवालाचे विश्लेषण करून जिल्ह्यातील सर्व तक्रारी व केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेतील आणि त्यावर आवश्यक कार्यवाही करतील. तसेच "राज्य दिव्यांग आयुक्त" राज्याचा अहवाल व केलेली कार्यवाही प्रत्येक तिमाहीस शासनास सादर करतील.

सर्व अहवाल सोबत जोडलेल्या परिशिष्ट आणि नमुना भरण्यासाठी सूचना याप्रमाणे विहित नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे.

**6.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२५१११३१६०७५५०२३५ आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TUKARAM H MUNDHE

Digitally signed by TUKARAM H MUNDHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PDWD, 2.5.4.20=D60C97125DD88B1F415C73CDEF592D0F67518BBD8BA278837219A7B9D7324AEC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=57B59F48D85074D9EA4B3BACF05E19E7030E9F2B74772901E229A4BAE0497214, cn=TUKARAM H MUNDHE
Date: 2025.11.13 16:09:42 +05'30'

**(तुकाराम मुंढे)**
**सचिव , महाराष्ट्र शासन**

**प्रति**

1) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल,मुंबई.
2) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय मुंबई.
3) मा. उपमुख्यमंत्री ( वित्त विभाग व नियोजन विभाग) यांचे सचिव, मंत्रालय मुंबई.
4) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग ) यांचे सचिव, मंत्रालय मुंबई.
5) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई.
6) मा.विधानसभा/विधान परिषद सर्व सदस्य, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
7) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

8) अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई
9) आयुक्त, दिव्यांग कल्याण, आयुक्तालय, पुणे
10) सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय
11) सर्व पोलीस आयुक्त / अधीक्षक,
12) सर्व आयुक्त, महानगरपालिका
13) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण कार्यालय,
14) सहाय्यक आयुक्त, मुंबई शहर / मुंबई उप नगर.
15) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
16) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, उपविभाग
17) सर्व समाज कल्याण अधिकारी,जिल्हा परिषद
18) सर्व जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी,जिल्हा परिषद
19) भारतीय जनता पार्टी,महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.1,योगक्षेमसमोर, वसंतराव नाईक चौक, नरिमन पॉईन्ट, मुंबई 400 021,
20) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश, कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई 400 025,
21) राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रपती भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग,नरिमन पॉईन्ट, मुंबई 400021,
22) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई 400 028,
23) बहुजन समाज पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी,मुंबई 400013,
24) भारतीय कम्युनिस्ट पार्टी,महाराष्ट्र कमिटी जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस,वरळी, मुंबई
25) भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई
26) महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई - 400 028,
27) निवड नस्ती/कार्यासन-1.

# परिशिष्ट

## अ) पोलीस अधीक्षक/ पोलीस आयुक्त यांनी जिल्हा दिव्यांगत्व समितीला सादर करावयाचा मासिक अहवाल

| अ.क्र. | प्राप्त झालेली/ स्वतःहून घेतलेली (Suo Moto) तक्रार नाव | तक्रारीवर केलेली कार्यवाही | "उपविभागीय दंडाधिकारी/ जिल्हा दंडाधिकारी" यांचेकडेपाठविण्यात आलेल्या तक्रारी | प्रथम माहिती अहवाल (FIR) दाखल केले असल्यास त्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |

( स्वाक्षरी )

## ब) उपविभागीय दंडाधिकारी/ जिल्हा दंडाधिकारी यांनी जिल्हा दिव्यांगत्व समितीला सादर करावयाचा मासिक अहवाल

| अ.क्र. | प्राप्त झालेली/ स्वतःहून घेतलेली (Suo Moto) तक्रार नाव | तक्रार दाखल झाल्याची तारीख | तक्रारीचे स्वरूप | अंतरिम आदेशाचे स्वरूप व दिनांक. | अंतिम आदेशाचे स्वरूप व दिनांक | न्यायिक दंडाधिकारी/ महानगर यांचेकडे तक्रार वर्ग केल्याची संख्या व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |

( स्वाक्षरी )

## क) जिल्हा दिव्यांगत्व समितीने "राज्य आयुक्तांना" सादर करावयाचा मासिक अहवाल

| अ.क्र. | जिल्ह्यात एकूण प्राप्त तक्रारी | FIR केलेल्या तक्रारी | अंतरिम आदेशाचे स्वरूप व दिनांक | अंतिम आदेशाचे स्वरूप व दिनांक | न्यायिक दंडाधिकारी/ महानगर दंडाधिकाऱ्यांकडे कलम 92 नुसार वर्ग केलेल्या तक्रारी | कलम ९२ नुसार आदेश | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |

( स्वाक्षरी )

## ड) राज्य आयुक्तांनी शासनास सादर करावयाचा त्रैमासिक अहवाल

| अ.क्र. | जिल्हा | एकूण प्राप्त तक्रारी | एकूण FIR | सक्षम प्राधिकाऱ्याचे अंतरिम आदेश | सक्षम प्राधिकाऱ्याचे अंतिम आदेश | न्यायिक दंडाधिकारी/ महानगर दंडाधिकाऱ्यांकडे कलम ९२ नुसार वर्ग केलेल्या तक्रारी | कलम ९२ अंतर्गत दाखल खटल्यांची संख्या | कलम ९२ नुसार आदेश | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 |
| 1. | | | | | | | | | |
| 2. | | | | | | | | | |
| 3. | | | | | | | | | |
| 4. | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| | | | | | | | | | |
| एकूण | 36 | | | | | | | | |

( स्वाक्षरी )